NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २४.१०.२०२६ शनिवार

(कामगिरी)

१) तहसील पोलीसांची कामगिरी :– अपहरण करुन खंडणी मागणाऱ्या आरोपीस अटक.

पोलीस ठाणे तहसिल हद्दीत, बकरामंडी दर्गाह जवळ, मोमीनपुरा, महात्मा फुले बाजार, तहसील, नागपूर येथे राहणारे फिर्यादी इकरा तबस्सुम असरार अहमद, वय २४ वर्षे यांचा भाऊ नामे हसनैन बिलाल असरार अहमद, वय २३ वर्षे व त्याचा मित्र नामे रोशन उर्फ जुबेर राजेश बुंदेल, वय २५ वर्षे, रा. तकीया दिवाणशाह, मोमीनपुरा, नागपूर हे दोघे दिनांक ११.१०.२०२६ रोजी गुवाहाटी येथे गेले असता, ते फिर्यादीसोबत दिनांक १४.१०.२०२६ पावेतो संपर्कात होते. त्यानंतर त्यांचे मोबाईलने आरोपी रॉकी नावाचे इसमाने फिर्यादीचे मोबाईलवर व्हिडीयो कॉल करुन, फिर्यादीचा भाऊ व त्याचा मित्र यांना बंदी बनविल्याचे दाखविले व जिवंत जाळुन मारण्याची धमकी देऊन १५ लाख रुपये खंडणी मागितली. अशा फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे तहसील येथे आरोपी रॉकी नावाचे इसमाविरुध्द कलम १४०(२), ३५१(३),२९६,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात तहसील पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन व गोपनिय माहितीवरुन आरोपींना निष्पन्न केले. आरोपी नामे नितीन दिलीप वंजारी, वय २८ वर्षे, रा. लष्करीबाग, गुप्ता आटा चक्कीजवळ, गली क्र. ९, पाचपावली, नागपूर यास ताब्यात घेऊन, गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी रॉकी नावाचा ईसम, रा. जिल्हा चिरांग, आसाम याचेसह वर नमुद गुन्हयामध्ये सहभागी असल्याचे कबुल केले. तहसील पोलीसांचे एक पथक जिल्हा चिरांग राज्य आसाम येथे जाऊन, त्यांनी तेथील स्थानिक पोलीसांचे मदतीने रॉकीचे मोबाईल लोकेशन नुसार शोध घेतला असता, तेथे फिर्यादीचा भाऊ व मित्र बंधक स्थितीत मिळुन आले परंतु, आरोपी नामे रॉकी हा मिळुन आला नाही. दोन्ही अपहृत इसमांना ताब्यात घेऊन, नागपुर येथे आणुन, त्यांचे परिवाराचे ताब्यात सुखरुपपणे देण्यात आले. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनात, वपोनि. संजय मेंढे, पोउपनि. मनिष शाहाकार, कुलदीप गडम, पोहवा. प्रदीप सोनटक्के, अतुल ढवंडे, उमाकांत नागदिवे, पोअं. सचिन जैस्वाल, राजेश ढवळे, संदीप शिरफुले, महेंद्र सेलोकार, संजय तिवारी यांनी केली.



२) वाडी पोलीसांची कामगिरी :— एटीएम फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक.

फिर्यादी निखिल नामदेवराव पोतदार, वय ३६ वर्षे, रा. माऊली पॅलेस, प्लॉट क्र. ०७, जयदुर्गा को—ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, नरेंद्र नगर, नागपूर हे बॅक ऑफ इंडीया, शाखा राठी ले—आऊट, आठवा मैल, दवलामेटी, वाडी, नागपूर येथे बॅक मॅनेजर आहेत. दिनांक ०२.१०.२०२६ रोजी ०८.०० वा. बॅकेंच्या शेजारील दुकानदाराने फिर्यादीस फोन करुन कळविले की, बॅकेंचे चॅनेल गेट उघडे आहे. फिर्यादीने बॅकेंत येऊन पाहणी केली असता, चॅनेल गेटचे कुलुप तोडलेले व आतील गेटचे कुलुप तोडण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन आले. फिर्यादीने बॅकेंतील सीसीटिव्ही कॅमेरा फुटेज तपासले असता, तीन अज्ञात २० ते ३० वर्ष वयोगटातील आरोपींनी तोंडाला कपडा बांधुन, दिनांक ०२.१०.२०२६ चे ०४.०० वा. बॅकेचे कुलुप तोडण्याचा प्रयत्न करतांना दिसुन आले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे अज्ञात तीन आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३२४(२),३३१(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान वाडी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपासादरम्यान सीसीटिव्ही फुटेजची पाहणी करून व गुप्त बातमीदार मार्फतीने तसेच, पोलीस ठाणे यशोधरानगर येथील तपास पथकाचे मदतीने घरफोडी व वाहनचोरी करणारे तीन आरोपींना निष्पन्न केले. निष्पन्न आरोपींच्या सतत मागावर राहुन, आरोपी १) निलेश मुरलीधर बावणे, वय २१ वर्षे, रा. वनदेवी चौक, शोफीया आटा चक्कीमागे, यशोधरानगर, नागपुर यास ताब्यात घेतले. आरोपीस नमुद गुन्ह्यासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने त्याचे साथीदार पाहिजे आरोपी क्र. २) विक्की डेहरीया, रा. नाईक तलाव, पाचपावली व ३) रहीम करीम शेख, रा. वनदेवी नगर, यशोधरानगर, नागपुर यांचेसह संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन मगर, सपोनि. कुणाल धुरट, पोहवा. रोशन फुकट, सोमेश्वर वर्धे, राहुल बोटरे, धमेंद्र यादव, पोअं. विनोद कुंभलकर यांनी केली.



३) गुन्हेशाखा, वाहनचोरी विरोधी पथकाची कामगिरी :— कसिनो मशिनवर जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल. रू. ३,२६,७१५/— चा मुद्देमाल जप्त

दिनांक २४.१०.२०२६ चे १६.१५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा, वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, पथकातील पोहवा. शंभुसिंग किरार यांना त्यांचे गोपनिय बातमीदार मार्फतीने माहीती मिळाली की, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, शोभाखेत, लाल बहादुर शास्त्री गार्डनसमोरील शॉपमध्ये अवैधरित्या कसिनोच्या माध्यमातुन लोकांकडुन पैसे घेऊन हारजीतचा जुगार खेळविला

जात आहे. अशा खात्रीशीर माहीतवरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी क्र. १) कसिनो मालक नामे साहील शेख शाकीर शेख, वय २३ वर्षे, रा. मोठा ताजबाग, मेन गेटजवळ, सक्करदरा, नागपुर हा कसिनोमध्ये काम करणारे आरोपी क्र. २) शुभम प्रकाशराव कोठाले, वय ३१ वर्षे, रा. प्लॉट क्र. ४२, सत्यसाईबाबा सोसायटी, दत्तवाडी, वाडी, नागपूर व ३) संतोष तेजराम मेश्राम, वय ३१ वर्षे, रा. प्लॉट क्र. २, जय मॉ अंबे नगर, भुजाडे सायकल स्टोअर्स जवळ, भवानीनगर, पारडी, नागपुर यांचे मदतीने ग्राहक आरोपी क्र. ४) जादाब शेख मोहम्मद हुसेन, वय ५० वर्षे, रा. शांतीनगर, भांगडे प्लॉट, नागपूर ५) कुलदीप जगदीश तांबे, वय २७ वर्षे, रा. स्विपर मोहल्ला, ठक्करग्राम, पाचपावली ६) राजेश वसंतलाल कैथवास, वय ५२ वर्षे, रा. शोभाखेत, पाचपावली, नागपूर यांचेसह अवैधरित्या कसिनोवर पैशांची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळवतांना समक्ष मिळुन आले. आरोपी क्र. १ यास अधिक विचारपुस केली असता, तो त्याचे इतर साथीदार पाहीजे आरोपी क्र. १) सागर धनजोडे, रा. महाल, नागपूर २) फिरोज खान, रा. बोखारा, मानकापुर, नागपूर यांचेसह नमुद कसिनो पार्टनरशिपमध्ये चालवित असल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन रोख ८,९१५/–रू., वेगवेगळ्या कंपनीचे ०३ मोबाईल फोन, कसिनो साहित्य–मेगा फ्रिप्ले, विन, मिंट, लुडो, मास्टर, जलसा, हेलोविन, ड्रॅगन टायगर या कंपनीचे ०८ कसिनो मशिन, नेटर–०३ नग, जेबस्टर कंपनीचे मॉनिटर–०२, रेडसोल–०१, रिअर पोज–०२, माऊस किबोर्ड, पेटीएम व युपीआय पेमेंट मशिन, जिओनेट वायफाय, स्कॅनर मशिन, एचडी क्रिस्टल मॉनिटर व ईतर साहित्य असा एकुण ३,२६,७१५/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह पाचपावली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. श्री पप्पु कादरी, पोउपनि. जिवन निवाने, सफौ. दिपक रिठे, पोहवा. सचिन बढीये, शंभुसिंग किरार, किशोर सोमकुंवर, पोअं. विवेक कावडकर, राहुल कुसरामे यांनी केली.



<u>४) गुन्हेशाखा पोलीसांची कामगिरी :– देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या स्पा चालकाविरुध्द गुन्हा दाखल.</u>

दिनांक २४.१०.२०२६ चे १७.१० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा, सामाजिक सुरक्षा विभाग व अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक पथकाचे अधिकारी व अंमलदार गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, सामाजिक सुरक्षा विभाग पथकातील पोअं. सुशिल बहिरे यांना त्यांचे गोपनिय बातमीदार मार्फतीने माहीती मिळाली की, पोलीस ठाणे सदर हद्दीत, अचरज टॉवर, छावनी येथील ''ग्रेप्स स्पा ॲन्ड सलुन'' येथे देहव्यापार सुरु आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे स्पा कर्मचारी आरोपी नामे

हार्दीक नितीन नागपुरे, वय २२ वर्षे, रा. गंगाबाग रोड, पारडी, नागपुर हा पाहिजे आरोपी क्र. १) स्पा मालक– गुंजन राजेश आसरे, रा. त्रिमुर्ती नगर, नागपूर व २) स्पा मॅनेजर– अन्नु जमीर, रा. नागपुर यांचे सांगण्यावरुन आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करून देवुन, पिडीत महीलांना कमी वेळात जास्त पैसे कमविण्याचे आमिष देवुन, त्यांचेकडुन देहव्यवसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन ०३ पिडीत महीलांची सुटका करून, देहव्यवसायातील रोख २,०००/–रू., ०१ मोबाईल फोन, व इतर साहित्य असा एकुण किंमती ५२,०३०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सदर येथे कलम १४३(२)(३) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम– १९५६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करून मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, सामाजिक सुरक्षा विभागाचे पोनि. श्री दर्शन पाटील व अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक पथकाच्या मपोउपनि. मौसमी कटरे यांनी त्यांचे पथकासह संयुक्तिरित्या केली.





(गुन्हे)

१) पोलीस ठाणे जुनी कामठी :–शस्त्र बाळणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २४.१०.२०२६ चे १३.१५ वा. चे सुमारास, जुनी कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, मटन मार्केटचे मागील गेटजवळ एक इसम शस्त्र घेऊन वावरत आहे. अशा माहीतीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम संशयास्पद हालचाली करतांना दिसुन आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळू लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद रफीक उर्फ लिल्लु वल्द मोहम्मद नजीर, वय ४८ वर्षे, रा. हॉकी बिल्डींगचे पाठीमागे, बबलु किराणा दुकानाजवळ, कामठी, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेमध्ये लपविलेला एक लोखंडी चाकु किंमती ३००/–रू. चा मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. अमित ताजणे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे पोउपनि दिगांबर बोरकर यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे प्रतापनगर :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी युवराज विनायकराव चांभारे, वय ३८ वर्षे, रा. बॅक कॉलनी, गल्ली क्र. १, नरसाळा रोड, दिघोरी, नागपुर हे हेडा बिल्डर्स, टेलिकॉम नगर येथील बांधकामाचे साईटवर सुपरवायझर आहेत. दिनांक २३.१०.२०२६ रोजी साईटवरील चौकीदार यांनी त्यांना फोन करुन सांगितले की, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीतील टेलिकॉम नगर येथील बांधकामाचे साईटवरील फ्लॅट क्र. १२८ चे कुलुप तुटलेले आहे. फिर्यादी हे बांधकाम साईटवर आले असता, चौकीदार यांनी सांगितले की, दिनांक २२.१०.२०२६ चे ०७.३० ते ०८.०० वा. चे दरम्यान, आरोपी लक्की शाहु नावाचे इसमाने तेथे येऊन, मी इलेक्ट्रीशियन आहे असे म्हणून वर गेला व नमुद फ्लॅटचे कुलुप तोडुन, आत प्रवेश करुन रुममधील रामको कंपनीचे ४ एम.एम वायरचे एकुण १२ बंडल व इतर साहित्य असा एकुण १,१५,०००/–रू. चा मुद्येमाल त्याचे दुचाकी क्र. एम.एच ४९ सी.झेड २१४९ वर घेऊन गेला आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे प्रतापनगर येथे पोहवा. मोहन कनोजिया ९०४९९८९५७२ यांनी आरोपीविरूध्द कलम ३०५, ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे कोराडी :– दिनांक २४.१०.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे पुरुषोत्तम लिकराम कुदावळे, वय ७० वर्षे, रा. बोखारा माता मंदीरजवळ, कोराडी, नागपुर हे पोलीस ठाणे कोराडी हद्दीत वसुंधरा फार्म हाऊसचे समोरील मोकळ्या शेतामधील पडीक विहीरीमध्ये बकरीचे पिल्लु पडल्याने, त्या पिल्लाला वाचविण्यासाठी विहीरीमध्ये उतरत असता, त्यांचा तोल जाऊन ते पाण्यात पडले. त्यांना पोहता येत नसल्याने व विहीरीत गाळ जास्त असल्याने, ते गाळात फसुन पाण्यात बुडुन मरण पावले. मृतदेह फायर ब्रिगेडचे मदतीने बाहेर काढून पुढील कार्यवाहीस्तव मेयो हॉस्पिटल येथे पाठविण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी श्रावण पुरुषोत्तम कुदावळे, वय ४१ वर्षे, रा. बोखारा माता मंदीरजवळ, कोराडी, नागपुर यांनी दिलेल्या सुचेनवरून, पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. अंकित अंबेपवार ८६६८६४६३३४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

(मिसींग)

पोलीस ठाणे कोराडी :– फिर्यादी नामे ताज मोहम्मद चांद मोहम्मद शेख, वय ५८ वर्षे, रा. वार्ड क्र. ०५, श्रीवास नगर, कोराडी, नागपूर यांनी पोलीस ठाणे कोराडी येथे तक्रार दिली की, त्यांचा मुलगा नामे अजहर ताज मोहम्मद शेख, वय २७ वर्षे हा दिनांक १७.१०.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील देवी मंदीर परिसर येथून बेपत्ता झाला आहे. त्याचा शोध घेतला असता, मिळून आला नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यास फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कोराडी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ३ इंच, केस–काळे व लांब, अंगात–काळया रंगाचा टिशर्ट व निळा जिन्स पॅन्ट, काळी चप्पल घातलेली आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात.



अजहर

(ईतर)

<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. जिल्हा न्यायाधीश –१४ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर.	२३७/२०२५	कलम १०३(१) भा.दं.वि.	संदीप संजय नाडे रा. राहाटे नगर, शंकर किराणा दुकान जवळ, बेलतरोडी रोड, अजनी, नागपुर.	२६.१०.२०२६

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.